# कार्यकारी सारांश

## १. प्रस्तावना

महाराष्ट्र फिशरीस डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन मर्यादित (एम. एफ. डी. सी. एल.) तर्फे मुंबई मधील ससून डॉक मासेमारी बंदराचे नूतनीकरण प्रस्तावित आहे. ससून डॉक बंदरामध्ये सध्या कार्यक्षमतेपेक्षा अधिक मत्स्य व्यवसाय होत असून त्यामुळे बंदराची अवस्था बिकट झाली आहे. दुर्गंधी तसेच अनारोग्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. वरील परिस्थिती सुधारण्यासाठी एम. एफ. डी. सी. एल. तर्फे ससून बंदराचा नियोजनबद्ध विकास करण्याचा मानस आहे. हा प्रकल्प ससून बंदरापुरता मर्यादित असून यामध्ये नवीन जागेचे संपादन केले जाणार नाही. वरील प्रकल्पाला पर्यावरण मंजुरी आणि सी आर झेड मंजुरी आवश्यक आहे.




**आकृती १: ससून डॉकचे स्थान**

अक्षांश: १८ ५४' ४१.६६"

रेखांश: ७२ ४९' ३३.१५"

जवळचे शहर: कुलाबा - पश्चिम दिशेला सुमारे १.२८ किमी

जवळचे रेल्वे स्थानक - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सुमारे ३.२८ किमी

ससून डॉक पासून १० किमी च्या परिघात कोणतेही अभयारण्य नाही.

**२. प्रकल्पाची ओळख**

प्रस्तावित प्रकल्पामध्ये आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे बंदराचे नूतनीकरण केले जाईल तसेच मत्स्य व्यवसायासाठी स्वच्छता पूर्ण सोयी सुविधा आणि सांडपाणी व्यवस्थापन याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

| **क्र.** | **प्रकल्प विशेष** | **सध्या** | **प्रस्तावित** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १ | क्षमता (टन प्रति वर्ष) | >४५,००० | >४५,००० | बदल नाही |
| २ | क्षेत्रफळ | ९१,२६५.३५ चौ. मी. | ९१,२६५.३५ चौ. मी. | बदल नाही |
| ३ | बांधकाम क्षेत्रफळ | ३८०४ चौ. मी. | ४०५१.८८ चौ. मी. | ७८५५.८८ |
| ४ | मत्स्य व्यावसायिक | १०,००० | १०,००० | बदल नाही |
| ५ | सांडपाणी प्रक्रिया | काहीच नाही | इ टी पी, एस टी पी | इ टी पी, एस टी पी |
| ६ | खर्च (करोड रुपये) | ०० | ५२.१७ | ५२.१७ |

प्रस्तावित प्रकल्पामध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत.

| **सध्याच्या बंदराचे नूतनीकरण** | **प्रस्तावित नवीन बांधकाम** |
|---|---|
| १. पंप घर | १. लिलाव हॉल क्र. ३ बांधणे |
| २. लिलाव निवारा क्र. १ चे नूतनीकरण करून लिलाव हॉल बांधणे, समुद्री पाणी पुरवठा करणे | २. उंचावरील पथदिवे - एकूण ७ |
| ३. लिलाव निवारा क्र. २ चे नूतनीकरण करून लिलाव हॉल बांधणे, समुद्री पाणी पुरवठा करणे | ३. मत्स्य व्यावसायिकांसाठी निवारा - २१३.५ चौ. मी. |
| ४. शौचालय ब्लॉक ३ चे नूतनीकरण | ४. बर्फाचा कारखाना |
| ५. सुधारित विद्युत पुरवठा करणे | ५. जाळे विणण्यासाठी निवारा - १००.४५ चौ. मी. |
| ६. पाण्याची टाकी दुरुस्त करणे | ६. रेडिओ संपर्क सुविधा, क्रेन सुविधा, बोट दुरुस्ती |
| ७. इमारतींचे नूतनीकरण करणे | ७. फिशरी सर्वे ऑफ इंडिया च्या इमारतीचे कुंपण |
| ८. इंधन पुरवठा सोयीचे नूतनीकरण करणे | ८. नवीन इंधन पुरवठा, बर्फाचा चुरा करण्याची सुविधा |
| ९. खुला लिलाव निवारा बांधणे | ९. नवीन बोलार्ड आणि फेंडर्स बसविणे |
| १०. कस्टम ऑफिस चे नूतनीकारण करून त्या जागेवर बर्फाचा चुरा करण्याची सुविधा बांधणे | १०. जुन्या ससून डॉक मधील गाळ काढणे (मेन्टेनन्स ड्रेजिंग) |
| ११. धक्क्याचे मजबुतीकरण करणे | ११. घातक कचरा साठवण्यासाठी निवारा बांधणे |
| १२. सांडपाणी व गटार व्यवस्था सुधारणे | |
| १३. बोटीमधील तेल मिश्रित पाणी वेगळे करणे | |
| १४. अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण करणे | |




**आकृती २: प्रकल्पाचा आराखडा**

**३. पर्यावरणाची सद्यस्थिती**

प्रस्तावित प्रकल्पाचा "पर्यावरणीय आघात मूल्यांकन" अहवाल अल्ट्रा टेक (पर्यावरणीय सल्लागार आणि प्रयोगशाळा) या नाबेट प्रमाणित संस्थेने बनविला आहे. हा अहवाल बनविण्यासाठी ससून डॉक मध्ये ऑक्टोबर ते डिसेंबर २०१६ या काळात पर्यावरणाचे परीक्षण करण्यात आले आहे. तसेच ससून डॉक पासून १० किमी च्या परिघातील क्षेत्रामधून मार्च ते मे २०१५ या काळात मिळवण्यात आलेली पर्यावरणीय माहितीचा हा अहवाल बनवण्यासाठी वापर करण्यात आला आहे.

हवामान, हवेची गुणवत्ता, पाण्याची गुणवत्ता, ध्वनी पातळी, मातीचे गुणधर्म, समुद्री पाणी आणि रेतीचे गुणधर्म, जैवविविधता तसेच सामाजिक घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. परीक्षण काळामध्ये वाऱ्याची मुख्य दिशा पश्चिम व वायव्येंकडून आढळली. वाऱ्याचा वेग सरासरी १.३२ मी. प्रति सेकंद एवढा आढळला. हवेचे तापमान १६.९ ते ३६.५ अंश सेल्सिअस आढळले. हवेची आर्द्रता ७०.१% ते ८१.५% एवढी होती.

हवेच्या गुणवत्तेचा एकूण ५ ठिकाणी अभ्यास करण्यात आला. पीएम २.५ ची पातळी २४ ते ५६ मायक्रो ग्राम प्रति घ. मी. एवढी आढळली. पीएम १० ची पातळी ६२ ते ९९ मायक्रो ग्राम प्रति घ. मी. एवढी आढळली. $SO_2$ ची पातळी १२ ते ३९ मायक्रो ग्राम प्रति घ. मी. आढळली. $NO_x$ ची पातळी २४ ते ५७ मायक्रो ग्राम प्रति घ. मी. आढळली. CO ची पातळी ०.८ ते २.८ मायक्रो ग्राम प्रति घ. मी. आढळली. सर्व घटकांची पातळी NAAQS च्या निर्धारित प्रमाणात आढळली.

ध्वनीची पातळी दिवसा ५९.७ डी बी आणि रात्री ५०.३ डीबी एवढी आढळली. बाणगंगा तलाव आणि काळबादेवी मंदिर येथील पाण्याचे परीक्षण केले असता त्या पाण्यामध्ये काठिण्य तसेच सुक्ष्म जंतूंचे प्रमाण अधिक आढळले. ससून डॉक चा परिसर हा पूर्णपणे शहरी असून मुख्यत्वे रस्त्याच्या बाजूचे वृक्ष आढळले. ससून डॉक च्या उत्तरेस सुमारे ६ ते ७ किमी वर सागरी पक्षांसाठी उत्तम पाणथळ अधिवास आहेत. परंतु प्रस्तावित प्रकल्प हा ससून डॉक पुरता मर्यादित असल्यामुळे ह्या नाजूक अधिवासांवर परिणाम अपेक्षित नाही.

ह्या प्रकल्पामध्ये जमिनीचे संपादन करण्यात येणार नाही. उलट ससून डॉकचे नूतनीकरण केल्याने येथील स्थानिक मत्स्य व्यावसायिकांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा होणार आहे.

मुंबई बंदरातील पाण्याची गुणवत्ता ३ ठिकाणी तपासली असता त्यामध्ये फारसा फरक आढळून आला नाही. पाण्याचे तापमान २८.४ ते २९.५ अंश सेल्सिअस एवढे आढळले. समुद्राच्या पाण्याचा सामू ७.६ ते ७.८ आढळला. तसेच क्षारता ३०.१ ते ३३.३ एवढी आढळली. पाण्यातील तेल व जड धातूंचे प्रमाण निर्धारित मात्रेपेक्षा कमी आढळले.

**४. पर्यावरणीय आघात व उपशमन उपाय**

प्रस्तावित प्रकल्पामुळे बांधकाम काळात तसेच सुधारित ससून डॉक कार्यान्वित झाल्यानंतर पर्यावरणाच्या विविध घटकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे. याद्वारे पर्यावरणावर होणारे घातक परिणाम कमी करण्यासाठी व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. पर्यावरणाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे करण्यासाठी परीक्षण वेळापत्रक बनविण्यात आले असून त्याच्या अंमलबजावणी साठी निधीची तरतूद सुचवलेली आहे.

या प्रकल्पामुळे कोणत्याही कुटुंबाचे विस्थापन होणार नाही. याउलट सुमारे २०० लोकांना रोजगार उपलब्ध होईल. प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर बंदरात तयार होणाऱ्या जैविक कचऱ्याचे विघटन करून तयार झालेले खत हिरवळ वाढवण्यासाठी वापरण्यात येईल. कार्यालय व इतर ठिकाणी तयार होणार अविघटनशील कचरा मुंबई महानगर पालिकेकडे सोपवला जाईल. बंदरात तयार होणारे सांडपाणी हे प्रक्रिया करून नंतर समुद्रात सोडले जाईल. समुद्रात सोडलेल्या पाण्याची गुणवत्ता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या मानकांनुसार असेल.

**५. पर्यावरण व्यवस्थापन निधी**

| **क्रमांक** | **पर्यावरण पैलू** | **भांडवली** खर्च **रुपये (लाख)** | आवर्ती खर्च **रुपये (लाख)** |
|---|---|---|---|
| १ | उत्सर्जन नियंत्रण उपाय | २.०० | ०.५० |
| २ | सांडपाणी व्यवस्थापन | ३०.०० | ५.०० |
| ३ | घनकचरा व्यवस्थापन | ८.०० | २.०० |
| ४ | हरितपट्टा | २.०० | ०.५० |
| ५ | पर्यावरण परीक्षण | | ५.०० |
| | **एकूण** | **४२.००** | **१३.००** |